8 JUL 2017

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कंझ्युमर्स स्टोअरचे झाले 'हाय'पर मार्केट



## शिवाजी विद्यापीठ : एकाच छताखाली हजारो वस्तू, उलाढाल पावणेपाच कोटींवर

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. ७ : शैक्षणिक साहित्यापासून अन्नधान्याची उपलब्धता करणारे शिवाजी विद्यापीठातील 'शिवबझार' कंझ्युमर स्टोअर नव्या रूपात उभारले गेले आहे. मुलींच्या वसतिगृहालगत 'ना नफा ना तोटा' तत्त्वावर कार्यरत स्टोअरला 'हायपर' मार्केट रूप प्राप्त झाले असून अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थ्यांच्या सेवेत स्टोअर खुले झाले आहे. विशेष म्हणजे या स्टोअरने सुवर्णमहोत्सवी वर्षात



शिवाजी विद्यापीठ : कंझ्युमर्स स्टोअरचे बदललेले रुपडे.

पदार्पण केले असून त्याची गतवर्षाची वार्षिक उलाढाल चार कोटी पंचाहत्तर लाख रुपये इतकी राहिली आहे.

विद्यापीठाच्या स्थापनेनंतर विद्यापीठ अनुदान आयोगाच्या निर्देनानुसार १९६७ ला कंझ्युमर्स स्टोअरची स्थापना झाली आहे. स्टोअरमध्ये जीवनावश्यक वस्तूंची विक्री केली जाते. अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थी-विद्यार्थिनींना लागणाऱ्या आवश्यक वस्तू विद्यापीठाच्या कॅम्पसमध्येच उपलब्ध व्हाव्यात, हा त्यामागील उद्देश आहे. राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय कार्यशाळा, परिषदा, चर्चासत्रे यांना लागणाऱ्या साहित्याचा पुरवठा येथूनच केला जातो. अधिकारी व कर्मचाऱ्यांनी एखादी वस्तू खरेदी केल्यानंतर अथवा महिन्याकाठीचा बाजार भरल्यास झालेल्या हिशेबाची रक्कम वेतनातून वजा करण्याची सोय उपलब्ध आहे. टीव्ही, वॉशिंग मशीन यासारखी इलेक्ट्रॉनिक्स उपकरणेही येथून विक्री केली जातात. खरेदी-विक्रीचे सॉफ्टवेअर स्टोअरमध्ये उपलब्ध असून माफक दरात मालचा पुरवठा येथून केला जातो. तसेच स्टोअरतर्फे रिसर्च प्रोजेक्टकरिता निधीच्या स्वरूपात काही रक्कमही दिली जाते. पन्नास वर्षे वैविध्यपूर्ण वस्तुंचा पुरवठा करणाऱ्या या स्टोअरने सुवर्ण महोत्सवी वर्षात पदार्पण केले आहे. आणि याच वर्षात त्याचे रूपही पालटले आहे. दाटीवाटीने ठेवलेल्या वस्तूंमुळे हे स्टोअर आहे की गोदाम, असा प्रश्नही निर्माण व्हायचा.

पान २ वर »

### 'शिवबझार'चे लवकरच उद्घाटन

कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी या स्टोअरला 'शिवबझार' असे नाव दिले आहे. येत्या काही दिवसांत त्याचे उद्घाटन होणार असल्याची माहिती श्री. पाटील यांनी दिली. कंझ्युमर्सचे अध्यक्ष म्हणून पर्यावरणशास्त्र विभाग प्रमुख डॉ. पी. डी. राऊत कार्यरत आहेत.

## कंझ्युमर्स स्टोअरचे झाले 'हाय'पर मार्केट

» पान १ वरून

मात्र, आता हायपर मार्केटच्या थाटामाटात जीवनावश्यक, शैक्षणिक वस्तुंची मांडणी केली आहे. छत्री, बिस्किटे, काजू, बदाम, तांदूळ, कापड, कागद, पेनपासून विविध प्रकारच्या वस्तू येथे उपलब्ध केल्या आहेत.

स्टोअरचे सरव्यवस्थापक अवधूत पाटील म्हणाले, ''एम. कॉम.चे विद्यार्थी अभ्यासासाठी जे प्रकल्प हाती घेतात, त्यांना त्यासाठी सहकार्य केले जाते. हे स्टोअर जसा विद्यापीठातील अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थ्यांसाठी खुला आहे, तसा तो

- 8 JUL 2017

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'पसंतीनुसार मतदान पद्धती' मार्गदर्शक

## देवानंद शिंदे : वसंतराव मगदूम यांच्या पुस्तकाच्या सुधारित आवृत्तीचे प्रकाशन

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** 'पसंतीनुसार मतदान पद्धती व मतमोजणी' हे पुस्तक मार्गदर्शक ठरणारे आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी गुरुवारी येथे केले.

शिवाजी विद्यापीठ कर्मचारी संघाचे संस्थापक अध्यक्ष वसंतराव मगदूम लिखित 'पसंतीनुसार मतदान पद्धती व मतमोजणी'या पुस्तकाच्या सुधारित तिसऱ्या आवृत्तीचे प्रकाशन कुलगुरू डॉ. शिंदे यांच्या हस्ते झाले. विद्यापीठाच्या संगणक केंद्र सभागृहातील या कार्यक्रमात ते बोलत होते. कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, नूतन महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे कायदा-२०१६च्या अनुषंगाने प्रकाशित करण्यात येणारी ही तिसरी सुधारित आवृत्ती केवळ विद्यापीठांसाठीच नव्हे, तर पसंतीनुसार मतदान पद्धती वापरल्या जाणाऱ्या सर्वच निवडणुकांसाठी मार्गदर्शक आहे.



शिवाजी विद्यापीठात गुरुवारी 'पसंतीनुसार मतदान पद्धती व मतमोजणी' या पुस्तकाच्या तिसऱ्या आवृत्तीचे प्रकाशन कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते झाले. यावेळी शेजारी महेश काकडे, लेखक वसंतराव मगदूम, डॉ. डी. टी. शिर्के, अजित चौगुले, आदी उपस्थित होते.

वसंतराव मगदूम म्हणाले, सन १९८८ मध्ये या पुस्तकाची पहिली आवृत्ती प्रकाशित झाली. त्यानंतर सन १९९५ मध्ये दुसरी आवृत्तीही प्रकाशित केली. या दोन्ही आवृत्यांचे राज्यभरातून मोठे स्वागत झाले. नूतन विद्यापीठ कायद्याच्या अनुषंगाने होणाऱ्या निवडणुकांसाठीही ही नवीन आवृत्ती उपयुक्त ठरेल. या कार्यक्रमास यावेळी प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे, अजित चौगुले उपस्थित होते. सुनील देसाई यांनी प्रास्ताविक केले. संजय पसारे यांनी आभार मानले.

- 8 JUL 2017

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# मतदानाबाबत वसंतराव मगदूम यांचे पुस्तक मार्गदर्शक

## कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

'पसंतीनुसार मतदान पद्धती व मतमोजणी' हे वसंतराव मगदूम यांचे पुस्तक अत्यंत उपयुक्त व मार्गदर्शक स्वरूपाचे आहे, असे उद्‌गार शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे' यांनी येथे केले. वसंतराव मगदूम यांच्या 'पसंतीनुसार मतदान पद्धती व मतमोजणी' या पुस्तकाच्या सुधारित तिसऱ्या आवृत्तीचे प्रकाशन कुलगुरू डॉ. शिंदे यांच्या हस्ते विद्यापीठाच्या संगणक केंद्र सभागृहात झाले. त्यावेळी ते बोलत होते.

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, नूतन महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे कायदा - २०१६ च्या अनुषंगाने प्रकाशित करण्यात येणारी ही तिसरी सुधारित आवृत्ती केवळ विद्यापीठांसाठीच नव्हे, तर पसंतीनुसार मतदान पद्धती वापरल्या जाणाऱ्या सर्वच निवडणुकांसाठी मार्गदर्शक आहे. या मतदान पद्धतीचे विविध पैलू उलगडून दाखविण्याचे काम हे पुस्तक करते. यामध्ये निवडणूक अधिकाऱ्यांसमोर उद्‌वणाऱ्या अनेक लहानसहान शंकांचेही निरसन लेखकाने केले आहे. त्यामुळे पंसंतीनुसार मतदान पद्धतीसंदर्भात एक अतिशय उत्तम पुस्तक आपल्याच एका सहकाऱ्याने लिहिले आहे, याचा अभिमान वाटतो. मगदूम यांनी नूतन विद्यापीठ कायद्याचे सुलभ सोप्या भाषेत विश्लेषण करणारे असेच एक पुस्तक लिहावे, अशी अपेक्षाही त्यांनी या प्रसंगी व्यक्त केली.

मगदूम म्हणाले, विद्यापीठात विविध निवडणुका पसंतीनुसार मतदान पद्धतीने घेण्याचा अनुभव जमेस होता. त्या अनुभवाचा लाभही वेळोवेळी अन्य विद्यापीठे तसेच महाराष्ट्र शासनासही करून दिला. त्याच अनुभवावर आधारित एखादे मार्गदर्शक पुस्तक लिहावे, अशी संकल्पना पुढे आली आणि त्यातून १९८८ साली या पुस्तकाची पहिली आवृत्ती प्रकाशित झाली. त्यानंतर १९९५ साली दुसरी आवृत्तीही प्रकाशित केली. या दोन्ही आवृत्तींचे राज्यभरातून मोठे स्वागत झाले. तसेच त्याचा लाभही विविध विद्यापीठे व शासनास झाला, ही जमेची बाजू आहे.

नूतन विद्यापीठ कायद्याच्या अनुषंगाने होणाऱ्या निवडणुकांसाठीही ही नवीन आवृत्ती उपयुक्त ठरेल, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

यावेळी शिवाजी विद्यापीठ कर्मचारी संघाचे अध्यक्ष सुनील देसाई यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. संजय पसारे यांनी आभार मानले. यावेळी यावेळी प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे, प्रभारी वित्त आणि लेखाधिकारी अजित चौगुले उपस्थित होते. शिवाजी विद्यापीठाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

8 JUl 2017
पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सन्मान करून दिव्यांगांना योग्य संधी द्या

## कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे : सर्व शिक्षा अभियानांतर्गत साहित्य वाटप

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

दिव्यांगांमध्ये असामान्यत्व असते. त्यांचा सन्मान करून योग्य संधी दिली पाहिजे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.देवानंद शिंदे यांनी गुरुवारी जिल्हा परिषदेच्या राजर्षी शाहू सभागृहात केले. अध्यक्षस्थानी अध्यक्षा शौमिका महाडिक होत्या. सर्व शिक्षा अभियानांतर्गत दिव्यांगांना साहित्य वाटप कार्यक्रमात ते बोलत होते.

ते म्हणाले, दिव्यांग हे शरीराने जरी अपंग असले तरी ते मनाने अपंग कधीच नसतात. संयम, जिद्द, चिकाटी आणि अपार कष्टाच्या जोरावरच सकारात्मक दृष्टिकोन ठेवून कार्यरत असतात. त्यांचा अपमान न करता सन्मानाची वागणूक दिली पाहिजे. शिवाजी विद्यापीठाच्या माध्यमातूनही दिव्यांगांसाठी विविध योजना राबवल्या जातात. याचाही त्यांनी लाभ घ्यावा. जिल्हा परिषद व शिवाजी विद्यापीठ या दोघांनी मिळून दिव्यांगांसाठी एकत्रपणे कार्य करण्याचे आवाहनही कुलगुरू शिंदे यांनी केले.



कोल्हापूर : दिव्यांगांन साहित्य वाटप कार्यक्रमाचे उद्घाटन करताना शौमिका महाडिक. सोबत कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, इंद्रजित देशमुख, अरुण इंगवले. (छाया : पांडुरंग पाटील)

अध्यक्षस्थानावरून बोलताना जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा शौमिका महाडिक यांनी दिव्यांगांमधील शारीरिक अपंगत्व समाज स्वीकारत असतो. परंतु, मनानेच जर अपंगत्व स्वीकारले तर अशा व्यक्तींमध्ये समाज काहीच सुधारणा करू शकत नाही. शरीराने सुदृढ असणारी व्यक्ती मनाने जर अपंग असेल, तर ती कधीच यशस्वी होऊ शकत नाही, असेही अध्यक्षा महाडिक यांनी सांगितले.

प्रास्ताविक करताना शिक्षण समिती सभापती अंबरिश घाटगे यांनी जिल्ह्यातील सर्व प्राथमिक शाळा डिजिटल स्कूल करण्यात येणार आहे. यासाठी समाजातील सर्वच घटकांनी पुढे येणे आवश्यक आहे. शिवाजी विद्यापीठाकडून यासाठी सहकार्य करावे, असे सांगितले.

प्राथमिक शिक्षणाधिकारी सुभाष चौगुले यांनी स्वागत केले. त्यानंतर पाहुण्यांच्या हस्ते जिल्ह्यातील ५६१ दिव्यांग बालकांना विविध प्रकारचे ७३८ साहित्यांचे वाटप करण्यात आले. तसेच शिष्यवृत्ती परीक्षेत राज्य गुणवत्ता यादीत आलेल्या ५६ विद्यार्थ्यांचा सत्कारही यावेळी करण्यात आला.

या कार्यक्रमाला, उपाध्यक्ष सर्जेराव पाटील, महिला व बालकल्याण समिती सभापती शुभांगी शिंदे, गटनेते अरुण इंगवले, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी इंद्रजित देशमुख, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.एल. एस. पाटील यांच्यासह विद्यार्थी व पालक उपस्थित होते.

- 8 JUL 2017

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# माहिती तंत्रज्ञानामुळे झीरो पेन्डन्सी शक्य

## डॉ. अजय साळी : विद्यापीठात फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्रॅमचे उद्‌घाटन

कोल्हापूर / प्रतिनिधी :

माहिती तंत्रज्ञानाच्या साहाय्यानेच प्रशासकीय कारभारात झीरो पेन्डन्सीचे उद्दिष्ट साध्य करणे शक्य आहे, असे प्रतिपादन कोल्हापूर विभागाचे विभागीय उच्च शिक्षण सहसंचालक डॉ. अजय साळी यांनी केले. शिवाजी विद्यापीठाचा संगणकशास्त्र अधिविभाग आणि गुगल-इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या पाचदिवसीय फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्रॅमचे उद्‌घाटन करताना ते बोलत होते.

डॉ. साळी म्हणाले, प्रशासकीय कारभार गतिमान आणि पारदर्शी होण्याच्या दृष्टीने माहिती तंत्रज्ञानप्रणाली अत्यंत उपयुक्त ठरत आहे. मोबाईल ॲप्लिकेशन्स, संकेतस्थळे आणि ब्लॉगसारख्या माध्यमातून शिक्षण क्षेत्राच्या समस्या सोडविण्यास यश प्राप्त झाले आहे. याचे उत्तम उदाहरण म्हणून उच्च शिक्षण सहसंचालक कार्यालयाच्या उत्तम सेवा या संकेतस्थळाकडे पाहाता येईल. या संकेतस्थळामुळे विभागाला झीरो पेन्डन्सीचे उद्दिष्ट साध्य करता आले. विद्यापीठाच्या अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे (आय. क्यू. ए. सी.) प्रमुख व इलेक्ट्रॉनिक्स अधिविभागप्रमुख डॉ. आर. के. कामत यांनी तंत्रज्ञानाच्या साहाय्याने ग्रामीण भागातील लोकांच्या समस्या सोडविता येणे शक्य असल्याचे सांगितले. तसेच, तंत्रज्ञानाचा रचनात्मक व विधायक कार्यासाठी वापर करण्याची गरज असल्याचेही सांगितले.



कोल्हापूर : डॉ. अजय साळी यांचे स्वागत करताना डॉ. आर. आर. मुधोळकर. मध्यभागी डॉ. आर. के. कामत.

डॉ. मुधोळकर यांनी स्वागत आणि प्रास्ताविक केले. गुगल प्रायोजित 'ॲन्ड्रॉइड फंडामेन्टल डेव्हलपमेंट' या उपक्रमाची संकल्पना व महत्त्व स्पष्ट केले.

या फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्रॅममध्ये विद्यापीठाच्या विविध अधिविभागांतील व संलग्नित महाविद्यालयांतील ७० शिक्षक सहभागी झाले आहेत. त्यांना गुगलतर्फे ललित सिंग, श्रेयांश खन्ना व सिम्मी आनंद प्रशिक्षण देत आहेत. कबीर खराडे यांनी परिचय करून दिला. डॉ. के. एस. ओझा यांनी आभार मानले. डॉ. यु. आर. पोळ, डॉ. व्ही. एस. कुंभार, प्रसाद गोयल, परशुराम वडार आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- 8 JUL 2017
महाराष्ट्र टाईम्स

# पदवीसाठी प्रवेशप्रक्रिया सुरू

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

अभियांत्रिकी पदविकेनंतर अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रमाच्या थेट दुसऱ्या वर्षासाठीची प्रवेशप्रक्रिया ७ जुलैपासून सुरू झाली.

या प्रक्रियेतंर्गत १७ जुलैपर्यंत ऑनलाइन अर्ज भरणे व नावनोंदणीसाठी मुदत आहे. तसेच याच कालावधीत विद्यार्थ्यांच्या गुणपत्रिका व मूळ कागदपत्रांची पडताळणी करण्यात येणार आहे. १८ जुलै रोजी कच्ची गुणवत्ता यादी प्रसिद्ध होणार आहे. गुणवत्ता यादीबाबत हरकती घेण्यासाठी १९ व २० जुलैचा कालावधी देण्यात आला असून २१ जुलै रोजी अंतिम गुणवत्ता यादी प्रसिद्ध होणार आहे. ऑनलाइन नोंदणी करणे आवश्यक असून यासाठी पॉलिटेक्निक कॉलेजमध्ये असलेल्या सुविधा केंद्रांमध्ये ही प्रक्रिया सुरू राहणार आहे, तरी इच्छुक विद्यार्थ्यांनी संबधित कॉलेजमध्ये संपर्क साधावा, असे आवाहन केले आहे.

8 JUL 2017

**Times of India**

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# Vivekanand College included in CPE scheme

**Piyush.Bhusari**
@timesgroup.com

Rahul Gaikwad



City-based Vivekanand College has been awarded 1 crore under the college with potential excellence scheme by UGC

**Kolhapur:** Vivekanand College has been included in the University Grants Commissions (UGC) colleges with potential excellence (CPE) scheme.

According to college authorities they received a letter last week, from the UGC, informing them about the news.

Principal S Y Hongekar told **TOI**, "The UGC had recommended our college last year , however due to a few formalities being incomplete it announced our inclusion this year. This is our second tenure in the CPE. In the letter, we have been told that Rs 1 crore has been sanctioned for the development of the college."

He said the college was selected for the first phase of CPE back in 2010 and the tenure of that scheme ended in 2015.

"The expert committee of UGC reviewed the college in May 2016 for being recommended in the next phase. We were sure that our accomplishments would get us through the review," he said.

He said that with this inclusion in the CPE, the college is now eligible for the academic and administrative development fund of Rs 1 crore under CPE.

The UGC circular about the CPE scheme stated, 'This scheme is to identify colleges which have attained high standards in teaching, research and extension activities and hold promise of excellence. A college selected under the CPE scheme is provided substantial funds to improve and strengthen its infrastructure that would help it attain higher academic standards.'

According to the circular, the objectives of the scheme are to define and manage the processes included in the design, development, and delivery of the chosen academic programmes. The objective also stresses on the need to strengthen the academic and physical infrastructure for achieving excellence in teaching, research and outreach programmes so that the college would be comparable to global standards.

To be included in the scheme, the institute has to ensure it follows all the pre-requisites set by UGC, such as— the college should be more than 10 years old and should have secured a minimum B grade from the National Assessment and Accreditation Council (NAAC).

Interestingly, last year as many as 28 colleges from the state including three from Kolhapur division were selected for the CPE. These colleges had appeared before the UGC committee with a presentation in the last week of January 2016.